MHKO050006752021

**नियमित दिवाणी दावा क्र. ४९/२०२१ मधील नि. ३२ खालील आदेश**
**सुभाष बाळासो उर्फ बाळू दरिबे विरुध्द मालूताई बाळासो उर्फ बाळू दरिबे वगैरे**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. २ अ ते क यांनी दाखल केला असून सदर अर्जाद्वारे विना कैफियत व विना म्हणणे चा आदेश रद्द करण्यात येवून प्रतिवादींना सदर कामी कैफियत व मनाई अर्जास म्हणणे देण्याची परवानगी मिळावी, अशी विनंती केली आहे.

२. सदर अर्जात त्यांनी असे नमूद केले आहे की, प्रस्तूतची कैफियत देणेस प्रतिवादी यांनी जाणुनबूजून टाळाटाळ केलेली नाही. प्रस्तुत दावेतील वाद विषय हा स्थावर मिळकतीबाबतचा आहे. सदर मिळकतीमध्ये प्रस्तुत प्रतिवादी यांचे हक्क व हितसंबंध गुंतलेले आहेत. त्यामूळे त्यांची कैफियत रेकॉर्डवर घेवून आपले म्हणणे मांडण्याची त्यांना संधी मिळणार आहे. त्यांना सदरचे काम प्रामाणिकपणे चालविणेचे आहे. प्रतिवादी यांना दावेतील वाद विषयाबाबतची कागदपत्रे कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावामूळे विहीत मुदतीत मिळालेली नसल्याने त्यांना कैफियत देणेस विलंब झालेला आहे. प्रस्तूतचा अर्ज मंजूर झालेस वादीचे काहीही नूकसान होणार नाही. याउलट अर्ज नामंजूर झाल्यास प्रतिवादींचे पैशाने न भरुन येण्यासारखे अपरिमित असे नूकसान होणार आहे.

३. सदर अर्जास वादी यांनी निशाणी ३४ कडे आपले म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानूसार प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दिलेला अर्ज खोटा व चूकीचा आहे. यातील प्रतिवादी क्र. १ व २ यांना फेब्रुवारी २०२१ रोजी समन्स नोटीस लागू झाले होते. त्यानंतर प्रतिवादी क्र. १ व २ हे वकिलांमार्फत हजर झाले होते. तरीही त्यांनी कैफियत व म्हणणे दिले नव्हते. मा. कोर्टाने दि. २४/०३/२०२२ रोजी नोडब्ल्यूएस चा आदेश पारित केलेला आहे असे असताना देखील प्रतिवादी यांनी

नेमलेल्या तारखेस कैफियत दिली नाही व त्यांना कैफियत देण्यास १ वर्ष ५ महिने २० दिवस इतका विलंब झालेला आहे. अर्जात प्रतिवादी यांनी कोणतेही सफिशियंट कॉज नमूद केलेले नाही. त्यांनी केवळ कोव्हीड-१९ चे कारण नमूद केले आहे हे खोटे व चूकीचे आहे व सदरील कारण ग्राहय धरता येणार नाही. करीता अर्ज खर्चासह नांमजूर करण्यात यावा, अशी त्यांनी विनंती केली.

४. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

५. दाव्यातील अभिलेख पाहिला असता असे दिसून येते की, सदर दाव्यात प्रतिवादी यांना समन्स लागू झाले आहेत. त्यानंतर प्रतिवादी हे दाव्यात हजर झाले. परंतू त्यांनी कैफियत व निशाणी ५ करीता म्हणणे दाखल केले नाही. सदर समन्स फेब्रुवारी २०२१ रोजी लागू झाले असल्याने नियमाप्रमाणे ९० दिवसांचा कालावधी संपला आहे. तसेच प्रतिवादी यांच्याविरुध्द नोडब्ल्यूएस आदेश पारित झाला. परंतू सदरचे प्रकरण हे गुणवत्तेवर निकाली काढण्याकरीता व नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन दोन्ही पक्षांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. करीता अर्जातील नमूद कारण विचारात घेवून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे-

## आदेश

१. सदरचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी रुपये २००/- इतकी कॉस्ट वादी यांना देण्यात यावी.

Digitally signed by MRUNMAYEE M CHOUDHARY
Date: 2022.08.23 17:21:31 +0530

**ठिकाण - इचलकरंजी**
**दिनांक - २०/०८/२०२२**

**(एम.एम.चौधरी )**
**४ थे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,**
**इचलकरंजी.**